## जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली
## (पाणी टंचाई विभाग)

भ्रमणध्वनी क्र. 02456-221450 @ ई-मेल - rdc.hingoli123@gmail.com

जा.क्र.2017/पा.ट/ई-टेंडर/कावी- दिनांक -26.04.2017

### जाहीर ई-निविदा सुचनाः-

हिंगोली जिल्हयातील पिण्याच्या पाण्याची टंचाई भासणा-या ग्रामीण/नागरी भागातील गांवे/वाडे व तांडयांना टँकरव्दारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी दि.18.05.2017 ते 31.08.2017 अथवा टंचाई संपेपर्यंतच्या कालावधीसाठी अनुभवी व सक्षम कत्राटदाराकडुन ई-निविदा खालील प्रमाणे मागविण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| 1) ऑनलाईन निविदा व फॉर्मची किंमत | 5000/- (अक्षरी पाच हजार केवळ) प्रति निविदा रक्कम ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येईल. |
| 2) निविदा फॉर्म ऑनलाईन उपलब्ध दिनांक | दि. 02.05.2017 ते 16.05.2017 |
| 3) अनामत रक्कम (EMD) | रु. 1,00,000/- (अक्षरी एक लक्ष केवळ) ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येईल. |
| 4) ई-निविदा फॉर्म ऑनलाईन भरण्याची अंतीम दिनांक | दिनांक 16.05.2017 |
| 5) ई-निविदा लिफाफा 01 व 02 उघडण्याचा दिनांक व ठिकाण | दिनांक 18.05.2017 वेळ दुपारी 12.00 वा. जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली. |

इच्छुक कंत्राटदारांने दिनांक- 02.05.2017 ते दिनांक-16.05.2017 रोजी वेळ सायंकाळी 6.00 या वेळेत ई-निविदा http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने सादर कराव्यात. ई-निविदा दिनांक-18.05.2017 रोजी दुपारी 12.00 वाजता जिल्हाधिकारी कार्यालय हिंगोली येथे उपस्थित कंत्राटदार/ अधिकृत प्रतिनिधी यांच्या समक्ष ऑनलाईन पध्दतीने उघडण्यात येतील. ज्या कंत्राटदारांना काळया यादीत घोषीत केलेले असेल अथवा त्याबाबत कार्यवाही सुरु असेल अशांनी किंवा त्यांच्याशी संलग्न असलेल्या कंत्राटदारानी निविदा भरु नये. अशा कंत्राटदारांनी निविदा भरल्यास त्यांची निविदा विचारात घेतली जाणार नाही.

1. ई-निविदाचे फॉर्म दिनांक-02.05.2017 ते दिनांक-16.05.2017 या कालावधीत कार्यालयीन वेळेपर्यंत http://mahatenders.gov.in या संकेतस्थळाशी संपर्क साधुन ना परतावा ई-निविदा फि रुपये 5000/- (अक्षरी पाच हजार रुपये केवळ ) प्रति निविदा रक्कम Online SBI Net Banking वा NEFT ( National Electric Fund) पध्दतीने स्विकारण्यात येईल.

   पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे शासन निर्णय क्र.टंचाई/2012/प्र.क्र.53/पापू-14 दि.30.04.2012 नुसार विहित केलेले दर खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | टँकर / ट्रकवरील टाकीची पाणी वहन क्षमता | कमाल प्रतिदिन भाडे (रुपये) | कमाल प्रति किलोमिटर भाडे (रुपये) |
|---|---|---|---|
| 1. | 1 मे. टन | रुपये 158.00 | 2.00 |

   उपरोक्त शासन निर्णयान्वये शासनाने निर्देशीत केल्यानुसार ई-निविदेत भरावयाचे दर कमाल मर्यादेपेक्षा कमी राहतील हे इच्छुक निविदाकारने पहावे या कामल मर्यादेच्या वर आलेले दर ग्राहय धण्यात येणार नाहीत व ते अपात्र ठरविण्यात येतील.

2. ई-निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी इच्छुक कंत्राटदारास DSC (Digital Signature Certificate ) मिळविणे आवश्यक आहे.
3. ई-निविदाच्या तपशीलवार अटी व शर्ती निविदा फॉर्म सोबत दिल्या जातील.
4. ई-निविदा ऑनलाईन दोन बंद लिफाफे पध्दतीने भरावी लागेल.

5. लिफाफा क्रमांक 1 मधील कागदपत्राची पुर्तता न केल्यास लिफाफा क्रंमाक 2 उघडण्यात येणार नाही.
6. http://mahatenders.gov.in या संकेतस्थळाशी संपर्क साधुन फॉर्म Download करावा. सदरची NEFT ची पावती लिफाफा क्रमांक 1 मध्ये स्कॅन स्वरुपात जोडावी.
7. अधिक माहिती व संपर्कासाठी http://mahatenders.gov.in या संकेतस्थळाला भेट द्यावी. व कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.
8. **प्रस्तुत ई-निविदा दोन लिफाफा पध्दतीमध्ये मागविण्यात येत आहे.**

**अ) लिफाफा क्रमांक 1 :- तांत्रीक ई-निविदेचा लिफाफा (Annexure-A )** मध्ये खालील प्रमाणे **ऑन लाईन स्कॅन करुन जोडणे** व **एक प्रत या कार्यालयात जमा करणे** आवश्यक आहे.

a. या लिफाफयात ई-निविदा फॉर्मची नापरतावा रक्कम रु.5000/- ऑनलाईन पध्दतीने सादर करावी लागेल.
b. कंन्राटदाराकडे स्वत:च्या मालकीचे किंवा भागीदार असेल तर त्यांची हमीपत्र असे एकुण कमीत कमी 10 टँकर्स / ट्रक असणे आवश्यक आहे. पुरावा स्वरुपात निविदा सोबत देण्यात आल्यानुसार उप प्रादेशिक परिवहन अधिकारी (ARTO) यांच्या स्वाक्षरीने निर्गमित झालेले विहित विवरणपत्रातील माहितीसह प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. (स्कॅन स्वरुपात जोडावे)
c. गाडयांची नोंदणी (रजिस्ट्रेशन ) केल्याचा पुरावा (आरसी बुक सांक्षाकीत झेरॉक्स प्रती स्कॅन स्वरुपात जोडावे )
d. वाहन कर ( आरटीओ कडील टॅक्स ) भरणा केल्याचे सन 2015-16 व 2016-17 चे प्रमाणपत्र पुरावा. (स्कॅन स्वरुपात जोडावे )
e. चेसीसवर पाण्याची टाकी बसविलेले टँकर किंवा ट्रक बॉडीमध्ये पाण्याची टाकी बसविल्यास त्या वाहनाची नोंदणीकृत भारवहन क्षमतेमधुन रीकाम्या वाहनाचे वजन वगळण्यात आल्यानंतर येणारे वजन हे त्या वाहनाची पाणी वहन क्षमता म्हणुन ग्राहय धरण्यात येईल. त्यानुसार परवाना सादर करावा. (स्कॅन स्वरुपात जोडावे )
f. निवीदा कालावधीमध्ये वाहन सुस्थितीत असलेबाबत आर.टी.ओ. फिटनेस सर्टीफिकेट सादर करणे बंधनकारक राहील.
g. महाराष्ट्र राज्याअंतर्गत वाहन चालविण्याचा परवाना. (स्कॅन स्वरुपात जोडावे )
h. वाहनाचे वैध प्रदुषण नियंत्रण प्रमाणपत्र. (स्कॅन स्वरुपात जोडावे )
i. ई-निविदा कार भागीदारी संस्था/ वाहतुक कंपणी /सहकारी संस्था असलेल्या नोंदणी प्रमाणपत्राचे संस्थेच्या बायलॉजीची प्रत रोख भांडवल मागील दोन वर्षाचा लेखा परिक्षण अहवाल व ई-निविदा भाग घेण्यासंबधीचा/संस्थेचा / कंपणीचा ठराव. (स्कॅन स्वरुपात जोडावे ) तसचे निविदाकार व्यक्तीगत निविदाकार असल्यास मागील सलग तीन वर्षाचे आयकर भरणा केल्याचे विवरणपत्र व पॅनकार्डची छायांकीत प्रत जोडणे बांधनकारक राहील. (स्कॅन स्वरुपात जोडावे )
j. व्यवसाय कर सन 2015-16 व 2016-17 प्रमाणपत्र व पॅनकार्ड (स्कॅन स्वरुपात जोडावे )
k. पिण्याचे पाणी पुरवठा करणे बाबत दोन वर्षाचे अनुभवाचे प्रमाणपत्र (निविदा धारकाच्या नावाने स्कॅन स्वरुपात जोडावे )

9. इच्छुक निविदाकारास / कंत्राटदारास भारतीय दंड सहिंतेच्या कोणत्याही कलमान्वये शिक्षा झाली नसल्यास त्याबाबतचे / तो काळया यादीत समाविष्ट नसल्याबाबतचे रुपये 100/- च्या बाँडपेपरवरील शपथपत्र सादर करावे. (स्कॅन स्वरुपात जोडावे )
10. सदर लिफाफयात निविदा धारकाचे / संस्थेचे नांव, संपर्काचा संपुर्ण पत्ता व दुरध्वनी क्रमांक / भ्रमणध्वनी क्रमांक नमुद करावा.

11. ई-निविदेच्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत रुपये 100/- च्या बाँडवर शपथपत्र सादर करावे लागेल. (स्कॅन स्वरुपात जोडावे )

**ब-** अटी व शर्ती मधील कागदपत्राची पुर्तता न केल्यास लिफाफा क्रमांक 2 उघडला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**क- लिफाफा क्रमांक 2** या लिफाफ्यामध्ये BOQ (Bill Of Quality ) मध्ये दर भरुन http://mahatenders.gov.in वर अपलोड करावा लागेल

12. सदरची ई-निविदा सुचना वेबसाईट Hingoli . nic. in वर ही उपलब्ध आहे.

13. ई-निविदा उघडण्याची तारीख, वेळ तसेच अटी व शर्तीमध्ये बदल करण्याची आवश्यकता असल्यास बदलण्याबाबतचे अधिकारी जिल्हाधिकारी हिंगोली यांनी राखून ठेवले आहेत.

**स्थळ :-** हिंगोली
**दिनांक :-** 26.04. 2017

**स्थळ प्रतीवर मा.जि.अ. यांची स्वाक्षरी असे.**

**जिल्हाधिकारी हिंगोली करीता**

## जिल्हाधिकारी कार्यालय, हिंगोली
## ई-निविदा

हिंगोली जिल्हयातील ग्रामीण व नागरी टंचाईग्रस्त भागात पाणी टंचाईच्या निवारणार्थ गाव/वाडया/ तांडया मध्ये सन 2017 च्या उन्हाळयात (दिनांक- 18.05.2017 ते 31 ऑगस्ट 2017 किंवा टंचाई कालावधी संपेपर्यत ) पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी खाजगी मालकीचे ट्रक्स भाडयाने घेण्याच्या अटी व शर्ती खालील दर्शविल्याप्रमाणे राहतील.

1. कंत्राटचा कालावधी कामाचा आदेश दिलेल्या तारखेपासुन 31 ऑगस्ट 2017 अथवा टंचाई कालावधी संपेपर्यत व त्यापुढे दिलेल्या मुदतीपर्यत अमलात राहातील.
2. प्रस्तुतची ई-निविदा दोन लिफाफा पध्दतीने मागविण्यात येत आहे.

   **अ) लिफाफा क्रमांक 1 :- तांत्रीक ई-निविदेचा लिफाफा (Annexure-A )** मध्ये खालील प्रमाणे **ऑन लाईन स्कॅन करुन जोडणे** व **एक प्रत या कार्यालयात जमा करणे** आवश्यक आहे.

   a. या लिफाफयात ई-निविदा फॉर्मची नापरतावा रक्कम रु.5000/- व बयाना रक्कम रुपये रु.1,00,000/- (अक्षरी एक लक्ष फक्त.)ऑनलाईन पध्दतीने सादर करावी.
   b. कंत्राटदाराकडे स्वतःच्या मालकीचे किंवा भागीदार असेल तर त्यांची हमीपत्र असे एकुण कमीत कमी 10 टँकर्स / ट्रक असणे आवश्यक आहे. पुरावा स्वरुपात निविदा सोबत देण्यात आल्यानुसार उप प्रादेशिक परिवहन अधिकारी (ARTO) यांच्या स्वाक्षरीने निर्गमित झालेले विहित विवरणपत्रातील माहितीसह प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.
   c. गाडयांची नोंदणी (रजिस्ट्रेशन ) केल्याचा पुरावा (आरसी बुक सांक्षाकीत झेरॉक्स प्रती )
   d. वाहन कर ( आरटीओ कडील टॅक्स ) भरणा केल्याचे सन 2015-16 व 2016-17 चे प्रमाणपत्र पुरावा.
   e. चेसीसवर पाण्याची टाकी बसविलेले टँकर किंवा ट्रक बॉडीमध्ये पाण्याची टाकी बसविल्यास त्या वाहनाची नोंदणीकृत भारवहन क्षमतेमधुन रीकाम्या वाहनाचे वजन वगळण्यात आल्यानंतर येणारे वजन हे त्या वाहनाची पाणी वहन क्षमता म्हणुन ग्राहय धरण्यात येईल. त्यानुसार परवाना सादर करावा.
   f. निवीदा कालावधीमध्ये वाहन सुस्थितीत असलेबाबत आर.टी.ओ. फिटनेस सर्टीफिकेट सादर करणे बंधनकारक राहील.
   g. महाराष्ट्र राज्याअंतर्गत वाहन चालविण्याचा परवाना.
   h. वाहनाचे वैध प्रदुषण नियंत्रण प्रमाणपत्र.
   i. ई-निविदा कार भागीदारी संस्था/ वाहतुक कंपणी /सहकारी संस्था असलेल्या नोंदणी प्रमाणपत्राचे संस्थेच्या बायलॉजीची प्रत रोख भांडवल मागील दोन वर्षाचा लेखा परिक्षण अहवाल व ई-निविदा भाग घेण्यासंबधीचा/संस्थेचा / कंपणीचा ठराव. तसचे निविदाकार व्यक्तीगत निविदाकार असल्यास मागील सलग तीन वर्षाचे आयकर भरणा केल्याचे विवरणपत्र व पॅनकार्डची छायांकीत प्रत जोडणे बांधनकारक राहील.
   j. व्यवसाय कर सन 2015-16 व 2016-17 प्रमाणपत्र व पॅनकार्ड .
   k. पिण्याचे पाणी पुरवठा करणे बाबत दोन वर्षाचे अनुभवाचे प्रमाणपत्र.
3. इच्छुक निविदाकारास / कंत्राटदारास भारतीय दंड सहिंतेच्या कोणत्याही कलमान्वये शिक्षा झाली नसल्यास त्याबाबतचे / तो काळया यादीत समाविष्ट नसल्याबाबतचे रुपये 100/- च्या बाँड पेपरवरील शपथपत्र सादर करावे.
4. सदर लिफाफयात निविदा धारकाचे / संस्थेचे नांव, संपर्काचा संपुर्ण पत्ता व दुरध्वनी क्रमांक / भ्रमणध्वनी क्रमांक नमुद करावा.
5. ई-निविदेच्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत रुपये 100/- च्या बाँडवर शपथपत्र सादर करावे लागेल. (स्कॅन स्वरुपात जोडावे )

ब- <u>लिफाफा क्रमांक -2 व्यापारी दराबाबतचा लिफाफा</u> BOQ (Bill Of Quality ) मध्ये दर नमुद करावे.

a. लिफाफा क्र. 1 मध्ये सर्व आवश्यक कागदपत्रे साक्षांकीत करणे जरुरी आहे.

b. प्रथम तांत्रीक लिफाफा क्र.1 उघडण्यात येईल. त्याची छाननी केल्यानंतर तांत्रीकदृष्टया पात्र असलेल्या ई-निविदाकारांचाच लिफाफा क्रमांक 2 BOQ (Bill Of Quality ) उघडण्यात येईल. तात्रीकदृष्टया अपात्र ई-निविदाकाराचा दराचा लिफाफा क्रमांक 2 BOQ (Bill Of Quality ) उघडण्यात येणार नाही.

6. ई-निविदाकाराने या कामी वापरण्यात येणा-या टँकरवरील वाहन चालकाची यादी , नांव , पत्ता व भ्रमणध्वनी क्रमाक इत्यादी तपशीलासह माहिती या कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील. याशिवाय प्रत्येक तालुक्यासाठी संपर्क व्यक्तीचे नांव, पत्ता व भ्रमणध्वनी क्रमाक देणे बंधनकारक राहील.

7. पाणी पुरवठा सहनियंत्रणाच्या दृष्टीने जिल्हाधिकारी यांना आवश्यकता वाटल्यास न्युनतम स्विकृत दरात एकापेक्षा अधिक कंत्राटदाराची नियुक्ती करण्याचा किंवा काम विभागुन देण्याचा अधिकार जिल्हाधिकारी यांनी राखुन ठेवलेला आहे. याकरीता ई-निविदाकाराने लिफाफा क्र.1 मध्ये त्याचे मालकीचे टँकर बाबतची माहिती ई-निविदापत्रा सोबत विहीत नमुन्यातील विवरणपत्रातील माहितीसह प्रमाणपत्र सादर करावे लागेल.त्याचा विहीत नमूना ई-निविदापत्रासोबत देण्यात आलेला आहे.

8. पुरविण्यात आलेले चेसीस टँकरची अथवा ट्रकची उपप्रादेशिक परीवहन अधिकारी यांनी प्रमाणित केलेली पाणी वहन क्षमता, मालकी हक्क, ईत्यादीची पडताळणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद, हिंगोली किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अथवा त्यांचे अधिनस्त संबंधीत कार्यालय/ अधिकारी यांचे मार्फत करण्यांत येईल.

9. यशस्वी निविदाकारास / कंत्राटदारास प्रत्यक्ष पाणी पुरवठा करतांना उपप्रादेशिक परीवहन अधिकारी यांनी वाहनपरत्वे प्रमाणित केलेल्या पाहणी वहन क्षमतेच्या कमाल मर्यादेपर्यंत पाणी वाहून नेता येईल. तथापि प्रत्यक्ष पाणी वहन केले जाईल तितक्याच वजनाचे देयक अदा केले जाईल. प्रमाणित पाणी वहन क्षमतेपेक्षा जास्त वजनाचा दावा केल्यास तो ग्राहय धरण्यात येणार नाही. तसेच उप्रप्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी प्रमाणित केलेल्या पाणीवहन क्षमतेमध्ये कोणत्याही परिस्थितीत टाकीचा आकार बदलुन पाणी वहन क्षमतेमध्ये वाढ अथवा घट करता येणार नाही. असे निदर्शनास आल्यास त्यास अटी व शर्तीचे उल्लंघन मानन्यात येईल.

10. वाहन चालकाची व्यवस्था त्याचा भत्ता, वाहनाची स्वच्छता , लागणारे इंधन, वाहनाची सर्व प्रकारची दुरुस्तीची व्यवस्था त्यावरील इतर किरकोळ खर्च याबाबींची वेगळी भरपाई दिली जाणार नाही.

11. पिण्याचे पाण्याचा पुरवठा करण्यासाठी ट्रक/टँकर्स भाडयाने घेण्यासाठी शासन मान्य दर खालील प्रमाणे आहेत. त्या दरापेक्षा कमी दराने पिण्याचे पाण्याचा पुरवठा करण्यास तयार असलेल्या कंन्रादाराकडुन निविदा मागविण्यात येत आहेत. निविदा पत्रात सदर दर भरुन घ्यावे लागतील शासन निर्णय क्रमांक टंचाई/1012प्र.क्र.53/पापु-14 दिनांक 30.04.2012 नुसार टँकर/ट्रकवर बसविलेल्या पाण्याच्या टाकीच्या पाणी वाहुन नेण्याच्या क्षमतेनुसार 1 मे टन. या एककामध्ये (Unit ) साठी विहित केलेले दर खालील प्रमाणे आहेत.

| टँकर / ट्रकवरील टाकीची पाणी वहन करण्याची क्षमता | कमाल प्रतिदिन भाडे (रुपये ) | कमाल प्रति किलोमिटर भाडे (रुपये ) |
|---|---|---|
| 1 मे. टन | 158 | 2.00 |

वरील दरापेक्षा ज्याचे दर कमी असतील अशाच कंत्राटदाराच्या दरांचा विचार करण्यात येईल.

12. जिल्हाधिकारी अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिका-यांनी आदेश दिल्यानंतर पाणी पुरवठा न केल्यास अथवा विलंबाने केल्यास प्रती दिनी, प्रती टँकर रु.2000/- किंवा परिस्थितीनुसार जिल्हाधिकारी निश्चित करतील त्या दराने दंड आकारुन देयकातुन वसुल करण्यात येईल.

13. टँकर पुरवठा करण्याचे आदेश जिल्हाधिकारी अथवा ते ज्या अधिका-यांना प्राधिकृत करतील अशा अधिका-यांनी लेखी आदेश दिल्याच्या तारखेपासुन 24 तासाच्या आत नमुद केलेल्या ठिकाणी

संबंधीत अधिका-याकडे टँकर सुपुर्द करावे लागतील. अ) आर.टी.ओ. रजिस्टेशन बंधनकारक ब) प्रशासकीय मान्यता आदेशात नमुद नुसार प्रत्यक्ष ज्या क्षमतेच्या वाहनाने पाणी पुरवठा केला जाईल. त्यानुसार जि.पी.एस.प्रणाली वर नोंदविण्यात आलेल्या फे-यांचीच प्रतीदिन व प्रती किलोमिटर भाडे मे.टन एककाच्या प्रमाणात बिल अदा केले जाईल.क ) टँकर मंजुर केल्यानंतर प्रत्यक्ष लावण्यापुर्वी त्या टँकरचे मागुन व पुढून भरलेले व रिकाम्या टँकरच्या वजनाचे फोटो काढुन क्षमता वजन काटयावर निश्चित केली जाईल, वजन काटयाचे निर्गमित केलेल प्रमाणपत्र कार्यालयाच्या अभिलेखात राहील व त्याचा खर्च संबंधीत ऐजन्सीला करावा लागेल.

14. कंत्राटदाराकडे स्वतःच्या मालकीचे किंवा पार्टनर असेल तर त्यांची हमी करारपत्र असे एकुण कमीतकमी 10 टँकर्स/ट्रक्स असणे आवश्यक आहे. त्यासाठी त्याना निविदेसोबत आवश्यक तो पुरावा सादर करावा लागेल. तसेच ट्रक मालकाकडे टाक्यासहीत ट्रक्स असणे आवश्यक आहे. अधिपत्याखालील किमान 40 टँकर्स /ट्रक्स पुरविण्याची क्षमता असल्याबाबत 100/- रुपयाचे स्टॅम्प पेपरवर शपथ पत्र सादर करावे.
15. पुरविण्यात येणा-या प्रत्येक वाहनाचे किलो मिटर दर्शविणारे मिटर चालु स्थितीत असावे त्या शिवाय वाहन स्किारण्यात येणार नाही. वाहने हिंगोली जिल्हयातील कोणत्याही गांवी व एका वेळी एकापेक्षा जास्त गांवाना,वाडयाना व रस्त्यांना एका वाहनाव्दारे पाणी पुरवठा करण्यासाठी उपयोगात आणण्यात येतील. त्या दुष्टीने निविदाधारकास जिल्हयात कोणत्याही वेळी कोणत्याही ठिकाणी पाणी पुरवठा करण्यासाठी निविदाधारक कार्यक्षम असावा. निविदा धारकास कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे व तसे प्रमाणपत्र सादर करावे.
16. वाहनावरील टाक्याची स्वच्छता राखणे, स्पीडोमिटर व ओडोमीटर दुरुस्त ठेवणे व पिण्यासाठी स्वच्छ व निर्जतुक पाणी पुरवठा करण्यासाठी कंत्राटदार जबाबदार राहील.
17. प्रत्येक टँकरच्या खेपेला त्याची सुरुवातीची व त्या खेपेची अंतीम मीटर रीडींगची नोंद त्याच दिवशी संबंधीत पंचायत समिती कार्यालयामध्ये कळविणे बंधनकारक राहील.
18. ई-निविदा काराने संपुर्ण जिल्हयासाठी कामाचे दर दयावयाचे आहेत. जिल्हयातील एखादया किंवा तालुक्यांचा दर दिल्यास त्याचा विचार केला जाणार नाही
19. सिंटेक्स टाक्या हाताळण्याचे बाबतीत लघु उद्योग महामंडळ यांचे कडुन प्राप्त झालेल्या सुचनाप्रमाणे आवश्यक ती दक्षता घेवुनच सिंटेक्स टाक्या हाताळल्या गेल्या पाहीजेत.
20. वाहनावर बसविण्यात येणा-या टाक्या चढविणे/उतरविणे व त्याचे मजबुतीसाठी वेल्डींग करणे इत्यादी साठीचा संपुर्ण खर्च कन्त्राटदारास करावा लागेल. त्याची भरपाई कंन्नाटदारास दिली जाणार नाही.
21. पाणी भरण्याचे ठिकाण संबधीत तहसिलदार यांच्या मान्यतेने पंचायत समिती कार्यालया मार्फत दर्शविण्यात येईल. दर्शविलेल्या ठिकाणा व्यतिरिक्त इतर ठिकाणावरुन जर पाणी पुरवठा कंन्नाटदाराने केले तर त्याची सर्वस्वी जबाबदारी कंन्नाटदारावर राहील व त्याचे भाडे दिले जाणार नाही.
22. प्रत्येक वाहनांची रोजनिशी (लॉगबुक )दररोज लिहीले पाहीजे व दिवसभरात करण्यात आलेल्या टँकरनिहाय फे-यांची माहिती दररोज गटविका अधिकारी व तहसिलदार यांना देणे बंधनकारक राहील.वाहनाची रोजनिशी (लॉगबुक ) वाहन धारकाकडे असणे बंधनकारक राहील. संबधीत गांवाचे ग्रामसेवक/ग्राम विकास अधिकारी यांनी वाहनाचे कि.मी. च्या झालेल्या रिंडींग वरुन लॉगबुकात नोंद घेतील व लॉगबुक संबधीत गटविकास अधिकारी यांनी प्रमाणीत केल्यानंतर व G.P.S यंत्रणेवर नोंदविलेल्या फे-यांचेच बिलाची रक्कम देण्याबाबत विचार केला जाईल. तसेच शासन परिपत्रक दिनांक 04.01.2003 नुसार त्या गावातील पाणी पुरवठा समितीने नामनिर्देशीत केलेल्या समितीवरील दोन महिला सदस्यांच्या प्रत्येक खेपेच्या वेळी टँकर/ट्रक प्राप्त झाल्याबाबत सहया घेणे बंधनकारक राहील.
23. शासनाने पाणी पुरवठयासाठी टँकर्सची क्षमता व प्रतिदिन भाडे ठरवुन दिलेले आहे. शासनाने ठरवुन दिलेल्या क्षमतेनुसार टँकर्सव्दारे पाणी वाहुन नेले तर मंजुर होणा-या दराने भाडे देण्यात येईल. परंतु पाणी पुरवठयासाठी कंन्नाटदाराने ट्रक्स पुरविल्या तर पुरविण्यात आलेल्या वाहनाव्दारे जितके लिटर

पाणी प्रत्यक्षात वाहुन नेले जाईल त्या प्रमाणात वाहनांचे भाडे वितरीत केले जाईल. फक्त ट्रक्सच्या क्षमतेनुसार भाडे दिले जाणार नाही.

24. बिलापोटी अगाऊ रक्कम दिली जानार नाही. आवश्यक कागदपत्रासह पुर्तता झाल्यानंतर बीलाची अदायगी निधीच्या उपलब्धतेनुसार व शासनाकडुन अनुदान प्राप्त झाल्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अथवा सक्षम अधिकारी यांचेकडुन नियमानुसार वितरीत करण्यात येईल.देयकाची रक्कम मिळण्यास उशीर झाला तर कोणतेही व्याज देय राहणार नाही.

25. महिना संपताच शक्यतो पाच तारखेपर्यंत बील जमा करावीत. नेमुन दिलेल्या क्षमतेच्या टँकरने नमुन दिलेल्या खेपा प्रमाणे खेपा टाकणे आवश्यक आहे. काही कारणाने उदा. टँकर बीघाड, उद्भव /विहीर इंजिन/विद्युत पंपाचा बिघाड विज पुरवठा खंडीत इत्यादी कारणाने कमी खेपा झाल्यास प्रत्यक्षात टाकण्यात आलेल्या G.P.S. प्रणालीवर नोंदविलेल्यांच खेपांचे भाडे आकारण्यात येईल. तसेच उपरोक्त कारणामुळे वाहाने उभे राहील्यास त्याचे भाडे अथवा नुकसान भरपाई दिली जाणार नाही. आर्णि नियमाप्रमाणे दंड आकारण्यात येईल.

26. कंत्राटदाराने स्पष्ट आदेश नसतांना वाहने तयार ठेवल्यास त्याबाबत वेगळा मोहबदला दिला जाणार नाही. वाहनाची आवश्यकता टंचाई परिस्थितीवर अवलंबुन असल्याने किमान हमी दिली जाणार नाही. तथापि आवश्यक त्यावेळी आवश्यक त्या प्रमाणातं वाहने उपलब्ध करणे कंत्राटदारावर बंधनकारक असेल.

27. ज्या कंत्राटदाराचे दर मान्य केले जातील त्यांना सुरक्षा ठेव म्हणुन रुपये 5,00,000/- (अक्षरी पाच लक्ष फक्त) निविदा मंजुर झाल्यानंतर तातडीने (बँक गॅरंटी / एफ.डी.आर.) स्वरुपात भरणा करावी लागेल. तथापि सदर रक्कमेवर कोणतेही व्याज देय राहणार नाही.

28. कंत्राटदाराने प्रत्येक टँकरमध्ये Global Positioning System (GPS) मार्फत टँकरची वेळोवेळी Exact Location व टँकरच्या फेऱ्यांचे नियमन करण्यासाठी शासनाचे स्थाई आदेश व निर्देशानुसार (GPS) उपकरण लावणे व दुरुस्त ठेवणे बंधनकारक राहील. (GPS) प्रणालीवर दैनदिन अहवालाची प्रत नियमीतपणे दररोज जिल्हा परीषद ग्रामीण पाणी पुरवठा विभागाच्या संबंधीत शाखेत व देयक अदा करणा-या संबंधीत कार्यालयात सादर करणे बंधनकारक राहील. आणि (GPS) प्रणाली बसविण्याबाबतचा खर्च संबंधीत कंत्राटदारास करावा लागेल. ऑनलाईन संगणक प्रणालमध्ये त्रुटी असल्याची सबब दाखवुन (GPS) प्रणालीच्या दैनदीन फेऱ्यांचा अहवाल दररोज नियमीतपणे सादर करण्यास असमर्थता असल्याबाबत कंत्राटदाराने दावा केल्यास ग्राहय धरण्यात येणार नाही. व त्याबाबत जिल्हा परीषदेमार्फत व तत्सम यंत्रणेकडुन देयके अदा केले जाणार नाही.

29. पाणी पुरवठा कामी लावण्यात आलेले सर्व टँकर्स अथवा कोणतेही टँकरची , त्यांने केलेल्या फे-याबाबत , त्याच्या उद्भवा बाबत किंवा इतर तत्सम माहितीसाठी तहसिलदार, गट विकास अधिकारी, उपविभागीय अधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हाधिकारी किंवा या व्यतीरिक्त जिल्हाधिकारी यांनी वेळोवेळी प्राधिकृत करतील असे अधिकारी / कर्मचारी यांना तपासणीचा अधिकार राहतील.

30. टँकर्स /ट्रक पुरवठा करण्याचे आदेश जिल्हाधिकारी हिंगोली अथवा शासन ते ज्या अधिका-यांना प्राधिकृत करतील अशा अधिका-यांनी लेखी आदेश दिलेल्या तारखेपासुन 24 तासाच्या आत नमुद केलेल्या ठिकाणी संबधीत अधिका-यांकडे सुपुर्द करावे लागतील. आवश्यकतेनुसार वाहने लावणे अथवा बंद करण्याचे अधिकार प्राधिकृत अधिका-यांना राहतील. तसेच वाहनांचे भाडे पाणी भरण्याचे ठिकाणापासुन ते ज्या गावात पिण्याचे पाणी पुरवठा केला जाईल तेवढया अंतरासाठी येण्याजाण्याचा जवळचे अंतर व GPS प्रणालीच्या दैनदिन फेऱ्या अहवाल विचारात घेवुनच दिले जाईल.

31. कंत्राटदारास ट्रॅक्सवर बसविणेसाठी पुरविण्यात आलेल्या पाण्याच्या टाक्या कंत्राटदाराचे नौकराने/ वाहन चालक यांनी गहान ठेवल्यास, विकल्यास किंवा मोडतोड केल्यास व त्यामुळे शासनाचे नुकसान झाल्यास त्याची भरपाई/वसुली कंत्राटदाराकडुन करण्यात येईल. खाजगी ठेकेदाराच्या वाहनाचे अपघात किंवा नुकसान झाल्यास किंवा अपघातामध्ये इसम दगावल्यास होणा-या न्यायालयीन किंवा इतर कोणत्याही कार्यवाहीस कंत्राटदार स्वतः जबाबदार राहील.

32. ई-निविदा प्रक्रीयेचे ई-निविदा बाबतचे कार्यक्षेत्र जिल्हा हिंगोली न्यायालयीन क्षेत्रातील राहील.
33. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मागणी प्रमाणे शासनाकडुन जसे जसे अनुदान प्राप्त होईल. ते मुख्य कार्यकारी अधिकारी यांना वाटपासाठी वर्ग करण्यात येईल. मात्र मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी वरील अटीची कंत्राटदाराकडुन पुर्तता झाल्यानंतर देयके कंत्राटदारांना अदा करावीत.
34. जिल्हाधिकारी अथवा प्राधिकृत अधिकारी यांनी आदेश दिल्यानंतर पाणी पुरवठा न केल्यास अथवा पाणी पुरवठयाचे काम असमाधानकारक असल्याचे आढळुन आल्यास किंवा निविदेतील कोणत्याही अटीचा भंग केल्यास कंन्नाटदारास दिलेले काम काढुन घेण्याचा अधिकार जिल्हाधिकारी यांना राहील. व पाणी पुरवठयासाठी दुस-या कंन्नाटदाराकडुन काम करुन घेतले जाईल. त्या प्रित्यर्थ मंजुर दरापेक्षा होणा-या जास्तीचा खर्च व फरकाची रक्कम मुळ कंन्नाटदाराकडुन जमीन महसुलाची थकबाकी म्हणुन वसुल करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी यांना राहील.
35. कंत्राटाच्या अटी बाबत किंवा पाणी पुरवठयाच्या कोणत्याही कामाबाबत कोणताही वाद निर्माण झाल्यास त्यांवर निर्णय घेण्याचा अधिकार जिल्हाधिकारी यांना राहील व तो निर्णय अंतीम राहील.
36. कंन्नाटदारास निविदेच्या कालावधीत दररोज काम देणे बंधनकारक राहणार नाही. जिल्हयात निर्माण होणा-या परिस्थितीनुसार आवश्यक तो बदल करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी यांना राहील.
37. जर दोन किंवा अधिक निविदेमध्ये दिलेले दर सारखेच असतील तर जिल्हाधिकारी यांना प्राप्त निविदेपैकी कोणती निविदा स्विकारावी याचा अधिकार राहील. त्यांनी घेतलेला निर्णय अंतिम राहील.
38. ज्याची निविदा स्विकृत करण्यात येईल त्या कंन्नाटदारास रुपये 100/- अक्षरी शंभर फक्त स्टँम्प पेपरवर विहित नमुण्यात तात्काळ करारनामा करावा लागेल. त्यानंतरच कार्यारंभ आदेश देण्यात येईल.
39. कंत्राटदाराने ई-निविदेत दिलेले दर ई-निविदा उघडल्यापासुन ई-निविदा मंजुर होईपर्यंत किंवा कार्यारंभ आदेश दिनांकापासुन लागु राहतील. त्यानंतर त्याच दरावर काम पुढे चालु ठेवावयाचे अथवा नाही यांचा संपुर्ण अधिकार जिल्हाधिकारी यांना राहतील व तो आदेश कंत्राटदारावर बंधनकारक राहील.
40. कंन्नाटदारास भारतीय दंड सहिंतेच्या कोणत्याही कलमान्वये शिक्षा झाली असल्यास/ काळया यादीत नांव घोषीत केले असल्यास किंवा त्या बाबत कार्यवाही सुरु असल्यास अशा कंन्नाटदाराने स्वतः किंवा त्याचे नातेवाईकांच्या नांवाने निविदा भरु नये. अशा कंन्नाटदाराना देण्यात आलेले कंन्नाट रदद करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी यांना राहील.
41. कंत्राटदाराने जकात, टोल, स्थानिक स्वराज्य संस्थेचा कर अथवा शासनाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार आकारलेला कर प्रचलीत नियमानुसार भरणे आवश्यक आहे.
42. शासनाचे आदेशानुसार व नियमानुसार आयकर (TDS) /सेवाकर व त्यावरील सरचार्ज रक्कम देय बिलातुन परस्पर कपात करण्यात येईल. आयकर खात्याने आयकर अथवा व्याजाची अथवा दंडाची मागणी केल्यास त्याची भरपाई कंत्राटदारास करावी लागेल.
43. ज्या कंन्नाटदारास निविदा प्रक्रियेस भाग घ्यावावयाचा असल्यास त्यानी सेक्युरिटी डिपॉझीट म्हणुन रुपये 1,00,000/- अक्षरी एक लाख रुपये Online SBI Net Banking/ NEFT ( National Electric Fund) भरावा लागेल.
44. ई-निविदाकाराने स्वतःच्या अटी नमुद करुन सादर केलेली ई-निविदा विचारात घेतली जाणार नाही.
45. ई-निविदा उघडण्याचे वेळी ई-निविदाकाराणे स्वतः उपस्थित राहणे अपेक्षीत आहे. प्रतिनिधी उपस्थित राहणार असल्यास तसे ई-निविदा काराचे स्वाक्षरीचे कायदेशीर प्राधिकारपत्र त्याचेजवळ असणे आवश्यक आहे.
46. नियोजीत तारखेस व ठिकाणी ई-निविदा उघडण्यात येतील तथापि गरज भासल्यास यामध्ये बदल करण्यात येईल व याबाबत उपस्थितीत ई-निविदाकारास ऑनलाईन पध्दतीने होत असल्यामुळे व्यक्तीकरित्या तसे कळविले जाणार नाही.
47. प्राप्त निविदेपैकी कोणत्याही दराची निविदा स्विकृत करण्याचा व कोणतेही कारण न देता निविदा रदद् करण्याचा अधिकार जिल्हाधिकारी यांनी राखुन ठेवला आहे.

48. निविदा प्रक्रीये दरम्यान अथवा त्यांनतर उपरोक्त अटीपैकी एखादी अट रद्द करणे / शिथील करणे वा एखादी नवीन अट टाकणे याबाबतचा संपुर्ण अधिकार जिल्हाधिकारी, हिंगोली यांना राहील.
49. वरील अटी व शर्ती मी /आम्ही काळजीपुर्वक वाचल्याअसुन त्या मला / आम्हाला मान्य आहेत. त्यांचा भंग केल्यास अथवा त्यानुसार कार्यवाही न केल्यास होणारी दंडात्मक कार्यवाही मला / आम्हाला मान्य राहील.
50. सदरील निविदा सुचना http://mahatenders.gov.in या Portal वर पहावयास मिळेस

**स्थळ:- हिंगोली**
**दिनांक :-26.04.2017**

**निविदाधारकांचे संपूर्ण नांव** **निविदाधारकाची स्वाक्षरी**

**स्थळ प्रतीवर मा.जि.अ. यांची स्वाक्षरी असे.**

**जिल्हाधिकारी हिंगोली करीता**

**हिंगोली जिल्हयातील ग्रामीण/नागरी भागातील टंचाईग्रस्त गावे/वाडया/तांडयाना पिण्याचे पाणी टँकरव्दारे पुरवठा करणे बाबत ई-निविदा सन 2017**

**जिल्हाधिकारी कार्यालय हिंगोली**

**(पाणी टंचाई विभाग)**

1. निविदा प्रसिध्दीचा दिनांक :- दि.02 .05.2017 दुपारी 12.00 वाजता
2. निविदा फॉर्म डाऊनलोडचा कालावधी :- दि.02 .05.2017 सकाळी 12.00 ते दि.16.05.2017 रोजी सांयकाळी 6.00 वाजेपर्यंत (कार्यालयीन वेळेत )
3. निविदा सादर करावयाचा कालावधी :- 02.05.2017 ते 16.05.2017.
4. निविदा उघडण्याची तारीख :- 18.05.2017 दुपारी 12.00 वाजता.
5. ई-निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ईच्छुक निविदाकारास DSC (Degital Signature Certificate ) मिळविणे आवश्यक आहे.
6. सदरील निविदा सुचना http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पहावयास मिळेल
7. अधिक माहितीसाठी या कार्यालयाचे दुरध्वनी क्रमांक :- 02456-221450 वर संपर्क साधावा

**स्थळ प्रतीवर मा.जि.अ. यांची स्वाक्षरी असे.**

**जिल्हाधिकारी हिंगोली करीता**

**निविदाकाराने लिफाफा क्र.1 मध्ये त्यांचे मालकीच्या टँकर /ट्रक बाबतची माहिती दर्शवितांना खालील विहित नमुन्यात प्रमाणपत्रासह माहिती सादर करावयाची आहे.**

## उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, ------------------

जा.क्र.

दिनांक :-

प्रमाणित करण्यात येते की, श्री / श्रीमती /मे. ------------------------------------------------------- याचे मालकीचे ----------- ट्रक / टँकर स्वत:चे मालकीचे असुन त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | वाहन नोंदणी क्र. (वाहनाच्या RC बुकच्या साक्षांकीत प्रतीसह) | वैध वाहन कर प्रमाणपत्र /पुरावा मुदत दिनांक | योग्यता प्रमाणपत्र / फिटनेस प्रमाणपत्र (ओडोमिटर सुरु असल्याचे प्रमाणपत्र) | वैध विमा प्रमाणपत्र मुदत दिनांक | महाराष्ट्र शासनाचा व्यवसाय कर भरल्याची पावती मुदत वर्ष | वैध प्रदुषण नियंत्रण प्रमाणपत्र मुदत दिनांक | महाराष्ट्रा अंतर्गत वाहन परवाना (Permit) मुदत दिनांक | भारवाहन क्षमता किलोग्रॅम मध्ये (नोदंणीकृत भार वाहन क्षमता (वजा)रिकाम्या वाहनाचे वजन टाकीसह) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 1 | | | | | | | | |
| 2 | | | | | | | | |
| 3 | | | | | | | | |
| 4 | | | | | | | | |
| 5 | | | | | | | | |
| 6 | | | | | | | | |
| 7 | | | | | | | | |
| 8 | | | | | | | | |
| 9 | | | | | | | | |
| 10 | | | | | | | | |

करीता प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

**उप प्रादेशिक परिवहन अधिकारी ---------------**